डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट हिंगोली जिल्हयातील मौजे पळशी तालुका "सेनगाव"अशी सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : डोंविका-२००९/प्र.क्र. ६ /का-१४८१-अ
मादाम कामा,मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ जुलै, २०१९.

वाचा :- १) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : डोंविका-२००९/प्र.क्र. ६/ का-१४८३, दि.१८ जानेवारी, २०१०.,
२) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : डोंविका-२००९/प्र.क्र. ६/ का-१४८३, दि.३१ जुलै, २०१२.

शासन शुध्दीपत्रक :-

डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट तालुक्यांच्या विभाजनामुळे, हिंगोली व बीड जिल्हयातील डोंगरी उपगटामध्ये समाविष्ट असलेल्या गावांच्या तालुक्यांच्या नावामध्ये बदल झाल्यामुळे, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३, दि.३१ जुलै, २०१२ अन्वये हिंगोली व बीड जिल्हयातील डोंगरी तालुक्यांच्या व गावांच्या नावात सुधारणा करण्यात आली. सदर शासन निर्णयातील "परिशिष्ट -२, हिंगोली उपगट तालुक्यातील गावांची यादी" मध्ये "अ.क्र. ३६, यादीतील क्र.२७, यादीतील नाव- फासेले, प्रस्तावित दुरुस्त नाव -पळसी, सद्याचा तालुका- हिंगोली" असे दर्शविण्यात आले आहे. मौजे पळशी या गावाचा सद्याचा तालुका -हिंगोली अशी नोंद तांत्रिक चुकीमुळे झाली आहे. त्यामुळे परिशिष्ट -२ हिंगोली उपगट तालुक्यातील गावांची यादी येथे दर्शविण्यात आलेले अ.क्र.३६, प्रस्तावित दुरुस्त नाव -पळसी, सद्याचा तालुका-"हिंगोली" याऐवजी **सद्याचा तालुका " सेनगाव " असे वाचावे.**

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७१११२२७४४४७१६ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VIJESING FATTESING VASAVE
Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.07.11 12:36:16 +05'30'

(वि. फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.राज्यपालांचे सचिव,

(२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
(३) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
(४) मा.विरोधी पक्ष नेता विधान सभा/विधान परिषद यांचे स्वीय सहायक.
(५) सर्व मा.विधानमंडळ सदस्य,
(६) शासनाचे मुख्य सचिव,
(७) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
(८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
(९) विभागीय आयुक्त,औरंगाबाद
(१०) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
(११) महालेखापाल ½ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
(१२) जिल्हाधिकारी, ठाणे, रायगड-अलिबाग, पुणे,अहमदनगर, यवतमाळ,नांदेड,नाशिक, सिंधुदुर्ग,नंदूरबार,जळगाव,रत्नागिरी,सातारा,सांगली,कोल्हापूर,औरंगाबाद,बीड, हिंगोली, अमरावती,बुलढाणा,अकोला,धुळे,पालघर.
(१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,हिंगोली.
(१४) विशेष कार्य अधिकारी (नियोजन) विभागीय आयुक्तांचे कार्यालय,औरंगाबाद.
(१५) जिल्हा नियोजन अधिकारी,हिंगोली.
(१६) जिल्हा कोषागार अधिकारी,हिंगोली
(१७)निवड नस्ती (का.१४८१-अ)

. . .